# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

भारतीय स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त सोमवार, दि. 15 ऑगस्ट, 2022 रोजी सकाळी ठीक 8.00 वाजता विद्यापीठाच्या आवारात मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनींनी या समारंभास उपस्थित रहावे ही विनंती.

जा. क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/1020
दिनांक : 08/08/2022

संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

1. सर्व पदव्युत्तर विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी–विद्यार्थीनी व प्रशासकीय सेवक यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
2. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
3. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत म्हणण्याची व्यवस्था करावी.
4. वाहन विभाग प्रमुख यांनी अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक कलाकार यांना वाद्ये आणणेसाठी वाहन उपलब्ध करून दयावे.
5. श्री. डी आर चौगुले व श्री. व्ही. डी. चांदणे, जमादार यांनी या समारंभावेळी मॅट आंथरणेसाठी व काढणेसाठी दोन शिपाई या विभागाच्या शिपायाच्या मदतीस दयावेत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वतः उपस्थित रहावे तसे आदेश आस्थापना विभागाने त्यांना द्यावेत.
6. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी ध्वजवंदन कार्यक्रमाच्यासाठी ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
7. अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तंभाची स्वच्छता व वरील कप्पीची ठाकठिकता पहावी. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाची देखभाल पहावी.
8. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मोठया पुतळयास अर्पण करणेसाठीचा पुष्पहार उद्यान विभागाने आणावा व तो अर्पण करण्याची व्यवस्था आभियांत्रिकी विभागाने करावी
9. नोटीस बोर्डवर लावणेसाठी–1) मुलांचे वसतिगृह क्र. 1, 2 व 3 2) मुलींचे वसतिगृह क्र. 1, व 2 3) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन 4) बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय
10. सुरक्षा अधिकारी यांनी परेडसाठी स्कॉड तयार करावे व ध्वजारोहण प्रसंगी ध्वज हाताळण्यासाठी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.

––000––